विठ्ठलवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २८ /२०२६ दि. २९ /०१/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, विठठ्लवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीतील दिनांक २९/०१/२०२६ ते दिनांक ०७/०२/२०२६ रोजी पावेतो श्री मलंग यात्रा उत्सव साजरा होणार असल्याने संपुर्ण महाराष्ट्र राज्यातुन तसेच बाहेरील राज्यातुन मोठया प्रमाणात सर्व धर्मिय भाविक हजारोंच्या संख्येने त्यांचे खाजगी वाहनाने तसेच परीवहन सेवेंच्या वाहनांनी व मिळेल त्या वाहनांनी श्री मंलग गड येथे दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे दरवर्षी वाहनांची मोठया प्रमाणावर गर्दी होवुन वाहतुक कोंडीची समस्या निर्माण होत असते. श्री मलंग गडाकडे जाण्यासाठी नेवाळी नाका हे महत्त्वाचे जंक्शन येत असल्याने तेथे मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

अ.क्र.	प्रकार	नो पार्किंगचे ठिकाण
१	**नो पार्कींग झोन**	नेवाळी नाक्याकडुन श्री मलंग वाडी कडे जाणा–या रोडवर नेवाळी नाका चौकापासुन रोडच्या दोन्ही बाजुला ५०० मी अंतरापर्यंत **नो पार्कींग झोन** करण्यात येत आहे.
२	**नो पार्कींग झोन**	नेवाळी नाका चौकाकडुन कल्याण कडे जाणा–या रोडवर नेवाळी नाका चौकापासुन रस्त्याचे दोन्ही बाजुस २०० मी अंतरापर्यंत **नो पार्कींग झोन** करण्यात येत आहे.
३	**नो पार्कींग झोन**	नेवाळी नाका चौकाकडुन डावलपाडा गावकाडे जाणा–या दोन्ही बाजुच्या रोडवर नेवाळी नाका पासुन २०० मी अंतरापर्यंत **नो पार्कींग झोन** करण्यात येत आहे.
४	**नो पार्कींग झोन**	नेवाळी नाका चौकाकडुन खोणीकडे जाणा–या दोन्ही बाजुच्या रोडवर नेवाळी नाका पासुन १०० मी अंतरापर्यंत **नो पार्कींग झोन** करण्यात येत आहे.

सदर अधिसूचना **दिनांक २९/०१/२०२६ रोजी पासुन दिनांक ०७/०२/२०२६ रोजी** पर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद

प्रत कार्यवाहीसाठी :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :— सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर

२/— म.न.पा. उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सूचना फलक लावून घ्यावीत.